कोलकोता फॅक्टरी पूर्ण क्षमतेने चालवण्यासाठी अफाट मेहनत आणि खर्च!

भारतीय ध्वनिमुद्रणाचा रंजक इतिहास

९०८ साली कलकत्ता येथे सिआल्दा रेल्वे स्टेशनपाशी ग्रामोफोन कंपनीने रेकॉर्डस् छापायचा कारखाना (Record Pressing Factory) काढला व हळूहळू मुद्रिका बनवण्याची पूर्ण यंत्रणा उभारली. इथे 'बाजा' वाजवून गाणी छापतात म्हणून ामान्य कामगारांनी त्याचे नाव ठेवले 'बाजाखाना'! या बाजाखान्यात संपूर्ण दक्षिण गयातल्या ध्वनिमुद्रिका बनवायचे ठरले होते. त्याअगोदर म्हणजे १९०२ ते ०८ या काळात सुमारे तीन/साडेतीन हजार रेकॉर्डस् तयार करण्यात आल्या होत्या या सर्व जर्मनीतील हॅनोवर येथे छापवून घेतल्या होत्या. ग्रामोफोन कंपनीने त्या ात (१८९९-१९०८) केलेल्या कामगिरीचा तपशील मायकेल किन्नर, ऑस्ट्रेलिया ा 'दि ग्रामोफोन कंपनीज फर्स्ट इंडियन रेकॉर्डिंग्ज' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ९४) या पुस्तकात येऊन गेलेला आहे.

भारतीय ध्वनिमुद्रिकांचा व ध्वनिमुद्रण उद्योगाचा ास ग्रंथबद्ध करायचे अफाट काम ऑस्ट्रेलियात श्री. किन्नर गेली ३० वर्षे करीत आहेत. त्याकरिता न, पॅरिस व भारतातील अनेक शहरे त्यांनी पुष्कळ पालथी घातली. ध्वनिमुद्रिकांचा ज्ञानकोश- कोग्राफी-अनेक भागांत प्रसिद्ध होतो आहे. यातील भाग 'दि ग्रामोफोन कंपनीज इंडियन रेकॉर्डिंग्ज ०८-१९१०)' हा अलीकडेच श्री. किन्नर यांनीच पलेल्या 'बाजाखाना प्रकाशन'तर्फे प्रकाशित झाला न त्याच्या मर्यादित प्रती प्रस्तुत लेखकाकडे उपलब्ध त.

१९०८ पर्यंतच्या सुमारे तीन हजार ध्वनिमुद्रिका ्याप्रमाणे एक प्रयोग होता तसाच तो एक अनुभवही . त्यातून कंपनीला आर्थिक लाभ तर झालाच, पण च्या वाटचालीकरिता काही 'धडे'पण शिकायला ाले. त्याच सुमारास ५/६ स्पर्धक कंपन्यांनी कत्ता व मुंबई येथे या उद्योगात प्रवेश केला होता. च्याशी टक्कर देऊन आपले वर्चस्व स्थापित याचे मोठेच आवाहन कंपनीच्या पुढे होते. त्यामुळे नवीन कारखान्याचा पूर्ण क्षमतेने र करून घेऊन कंपनीने आपल्या विरोधकांना कसे नामोहरम केले याचा काही शील या पुस्तकात वाचावयास मिळतो.

एकूण ३५० पानांपैकी तीनशेहून अधिक पाने ही १९०८ ते १९१० या दोन त कंपनीने बनविलेल्या ध्वनिमुद्रिकांच्या यादीची आहेत. मॅट्रिक्स/कॅटलॉग नंबर, याचे बोल व प्रकार तसेच ध्वनिमुद्रणाचा महिना/वर्ष यांसारखा तपशील शास्त्रशुद्ध ने नोंदवलेला आहे. सर्व भारतीय भाषांमधील व विविध संगीतप्रकारांच्या मिळून ण ५,८०० रेकॉर्डस्ची सूची या ग्रंथात वाचावयास मिळते. सुमारे तीनशेहून अधिक ाकारांचे संग्रह धुंडाळून व सर्व भारतभर हिंडून ही ध्वनिमुद्रणे मिळवलेली आहेत.

'दि ग्रामोफोन कंपनीज इंडियन रेकॉर्डिंग्ज (१९०८-१९१०)'- मायकेल किन्नर, ट्रेलिया (सन २०००) किंमत ६५ डॉलर्स (ऑस्ट्रेलियन) रुपये १५००/-; पृष्ठे

यात, अगोदरच्या काळातील विख्यात गोहरजान, मलकाजान, जानकीबाई, प्यारासाहेब यांच्या रेकॉर्डस् आहेतच पण आपल्या ध्वनिमुद्रित गायकीचा पुढील अनेक पिढ्यांवर



संस्कार करून गेलेल्या जोहराबाई आग्रेवाली या गायिकेच्या सर्व ध्वनिमुद्रिकांचा तपशीलही यात आलेला आहे. या दरम्यान दक्षिण भारतातही ध्वनिमुद्रणांची मोहीमच आखली गेल्याने तिकडचे किती तरी ख्यातनाम कलाकार या माध्यमातून साठवले गेले आहेत. कोईमतूर शहरामधील थायी नावाच्या गायिकेला चार हजार रुपयांत करारबद्ध करून तिच्या गावाचे नाव घेऊन 'कोईमतूर थायी' या नावाने रेकॉर्डस् बाजारात आल्या व कलकत्तावाल्या गोहरजानप्रमाणेच तिच्याही रेकॉर्डस् तडाखेबंद खपल्या. त्या रेकॉर्डस् किती तरी वर्षे कंपनीच्या कॅटलॉगमध्ये होत्या.

कंठसंगीताबरोबरच वाद्यसंगीताच्याही तीन-एक मिनिटांच्या रेकॉर्डस् घेण्यात आल्या. यात बँड, बॅगपाइप (सनई), बीन-पुंगी, बासरी, जलतरंग, हार्मोनियम, बेंजो (सरोद, सितार), व्हायोलिन व नागस्वरम यांचा समावेश आहे. कंपनीने जागोजागी एजंट नेमून ख्यातनाम कलाकारांना पाचारण केलेच पण अनेक संस्थानिकांनीही कंपनीचे दौरे 'प्रायोजित' करून आपल्या दरबारातील कलाकारांची ध्वनिमुद्रणे करून घेतली. भावनगर

उदाहरणे. भावनगरच्या महाराजांनी तर आपल्या दरबारातील गवई व आपली मुलगी राजकुमारी मेनकाकुमारीच्या सतारवादनाच्याही रेकॉर्डस करवून घेतल्या. त्या छोट्या 'शिकाऊ' मुलीचे वाजवणे इतके प्राथमिक स्वरूपाचे व हळू होते की या रेकॉर्डस्चे भवितव्य तिथेच ठरून गेले. पण म्हैसूर दरबारात महाराज कृष्णराज वाडियार यांच्या निमंत्रणावरून ऑगस्ट १९१० मध्ये सुमारे १०० गाणी घेण्यात आली. तेव्हा कलकत्याचे सतारिये इमदाद खान (विलायत खान यांचे वडील) दरबारात शाही पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्याही रेकॉर्डस् घेण्यात आल्या व त्यापुढे खूप खपल्या.

या दोन वर्षांमध्ये जॉर्ज डिलरने ध्वनिमुद्रणांची संपूर्ण जबाबदारी पेलली. त्यात भारताबरोबरच शेजारच्या देशांमध्ये जाऊनही मुद्रणे घ्यायची होती. त्यात मुंबई, कलकत्ता, मुलतान (पंजाब), रंगून, कोलंबो, बँकॉक, सिंगापूर, जावा, चीन, मलेशिया, दिल्ली, लखनौ, राजस्थान, मद्रास व म्हैसूर या ठिकाणी त्याची भ्रमंती झाली. सततच्या प्रवासाने व दगदगीने तो आजारीही पडे. बाहेरच्या देशातील ध्वनिमुद्रणे लंडन, जर्मनी यांसारख्या ठिकाणी पाठवताना हवामानातील बदलांमुळे ती वाटेत खराब होत. त्यामुळे कंपनीकडून तंबी मिळे. नोकरीवरून काढून टाकण्याच्या धमक्या येत. हे सगळे वार्षिक ५००-७०० रुपये पगारावर चालले होते. त्यावेळची वाहतूक व्यवस्था लक्षात घेता हे काम किती जिकिरीचे व जोखमीचे होते याचा अंदाज येतो.



मायकेल किन्नर

शिवाय इतर स्पर्धक कंपन्यांमुळे एकच कलाकार १०-१२ कंपन्यांकरिता तेच गाणे रेकॉर्ड करून खूप पैसा मिळवी. मोहम्मद हुसेन नगीनावाले, प्यारासाहिब यांच्यासारख्या त्यावेळच्या 'बड्या' कलाकारांनी एकच चीज वेगवेगळ्या लेबल्सवरच्या रेकॉर्डवर दिलेली जशीच्या तशी ऐकायला मिळते. त्यामुळे कलाकारांना 'करारबद्ध' (exclusive contracts) करून घेण्याचे नवीन तंत्र अवलंबावे लागले. तरीही बडी मंडळी त्याला जुमानत नसत व ते मागतील ती रोख रक्कम मेहनताना म्हणून त्यांना द्यावी लागे.

त्याचबरोबर स्पर्धक कंपन्यांना संपवायचे असेल तर नुकतीच स्थापन झालेली कलकत्ता फॅक्टरी पूर्ण क्षमतेत चालायला हवी होती. तिथेही तांत्रिक सफाई व परिपूर्णता येण्याकरिता तसेच भारतीय कामगारांना 'तरबेज' करण्याकरिता जॉर्जलाच अफाट मेहनत करावी लागली. ग्रामोफोन कंपनीने या दोन वर्षांत या मोहिमेकरिता सुमारे तीन हजार पौंड खर्च केले. परिणामी १९१० ते १९१३ या काळात प्रतिवर्षी सुमारे ४-५ लाख ध्वनिमुद्रिका आणि सुमारे सात हजार ग्रामोफोन मशीन्सची विक्री झाली. रेडिओ अजून फारच दूर होता. त्यामुळे ग्रामोफोन- रेकॉर्डस् हे हुकमी करमणुकीचे साधन बनले. १९१३-१९१४ सालामध्ये कंपनीची उलाढाल दीड कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोचली व पुढे ती उत्तरोत्तर वाढतच गेली. आज हा केवळ इतिहास उरला आहे. या पाच-एक हजार रेकॉर्डस्पैकी सुमारे पाचशे रेकॉर्डस् संग्राहक - संग्रहालयातून विश्रांती घेत आहेत. संशोधक, अभ्यासक व ध्वनिमुद्रिका संग्राहकांना हे पुस्तक संदर्भ म्हणून उपयोगाचे आहे यात शंकाच नाही. पण 'ठोकून देतो ऐसा जे' वृत्तीने अतिरंजित विधान-लिखाण करणाऱ्यांनाही यातून नेमकी माहिती मिळेल.